# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेस नोट

**जाहिर आवाहन (माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत जाहिर आवाहन)**

- महाराष्ट्र शासनाचे माझी वसुंधरा अभियान ४.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अभियानातंर्गत फटाके मुक्त, प्लास्टीक मुक्त, कचरामुक्त प्रदुषणमुक्त व पर्यावरण पुरक दिवाळी उत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.
- सदर अभियानातंर्गत नागरीकांनी फटाक्यांचा वापर टाळावा. प्लास्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करावा तसेच टाकाऊ वस्तुचा व पुनःवापर करण्यायोग्य वस्तूंचा वापर जास्तीत जास्त करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.
- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व फटाके विक्री करणारे व्यवसाय व फटाके वापर करणारे नागरिक यांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार अधिसुचना क्रमांक G.S.R. ६८२(E). Dr.५.१०.१९९९ अन्वये १२५ dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणा-या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे.
- मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरीयम सॉल्ट, लिथीयम, अर्सेनिक, लिड, मर्क्युरी या सारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करु नयेत.
- फटाक्यांची विक्री महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच करण्यात यावी...
- मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल PIL. No. ३ / २०२३ मध्ये संध्या ७.०० ते रात्री १०.०० या वेळेत फटाके फोडण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याचे पालन करण्यात यावे.

येणारी दिवाळी हरित व पर्यावरणपुरक दिवाळी म्हणून साजरी करुया. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो अशा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!

आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका